'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# शेती संकट, शेतकऱ्यांची आत्महत्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ . दिनकर रावजी मुरकुटे
महात्मा फुले महाविद्यालय १७- पुणे -पिंपरी.

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर भारतील जातिव्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला. जातीव्यवस्थेने 'शूद्र' समजले गेलेल्यांवर- विशेषतः अस्पृश्यांवर किती वाईट व भयावह परिणाम झाले; याचे विस्ताराने चर्चा करणे इथे अप्रस्तुत ठरेल. जातिव्यवस्थेमुळे अस्पृश्य समाज सत्ता, संपती व प्रतिष्ठा यांपसून वंचित राहिला इतकाच नव्हे तर , सुसह्य जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या साध्या नैसर्गिक मानवी आधिकारालाही पारखा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःच अस्पृश्य म्हणून जन्माला आले. त्यामुळे त्यांना जातिव्यवस्थेचे समूळ उच्चाटन अभिप्रेत होते. स्वाभाविकपणे त्यांनी जातिव्यवस्थेचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादि सर्व स्तरांवर मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यतेच्या दास्यातून 'अस्पृश्यांची मुक्ति' करणे हे त्यांच्या सर्व प्रयत्नांचे एकमात्र उद्देश होता.

**फुले आंबेडकरांची शेती विषयक भूमिका :**

भारतातील शेती आणि शेतकऱ्याची स्थिती कायमच अत्यंत विदारक राहिली आहे त्यास येथील सामाजिक विषमता कारणीभूत राहिली आहे. हि सामाजिक स्थिती बदलण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या प्रतिभेने उपाय सुचविले आहेत. "शेतीच्या शोधापासूनच मानवी संस्कृतीचा विकास झाला आणि तो शेतकऱ्यांच्या श्रमामुळेच झाला आहे, तरीही भारतातील शेतकऱ्यांची स्थिती गलीतगात्रच राहिली" असे डॉ. अनार्ल्ड टॉयन्बी यांनी भारतीय शेतकऱ्यां संबंधी म्हटले होते.

१८ व्या शतकात महाराष्ट्रात अधुन-मधून दुष्काळानेही कहर केला होता. त्याच प्रमाणे शेतकरी व सावकार यांच्यामधील संबंध बिघडण्यामुळे दंगे निर्माण झाले होते. जोतीराव फुले यांना शेतकऱ्याच्या भवितव्या विषयी चिंता वाटू लागली. हा शेतकरी वर्ग या ऋणातून मुक्त होऊन सावकार शेतकरी यांचातील संबंध सुधारावे हया उद्देशाने हा निबंध करण्यात आले होता. सावकारांच्या आणि ब्राह्मण भिक्षुकांच्या अमर्याद अधाशिपणामुळे शेतकऱ्यांना ती वाईट स्थिति प्राप्त झाली होती. जर शेतकरी आणि सावकारा मध्ये देण्याघेण्याचे कमीत कमी संबंध आले, तर शेतकरी स्वावलंबी व उद्योगी होतील आणि आपल्या उत्पन्नावर जगू शकतील; त्यांच्या आज्ञानीपणा व अशिक्षितपणा यामुळेच त्यांची अशी दशा झाली आहे, असे 'दीनबंधु' ने मत व्यक्त केले.[31]

महात्मा जोतीराव फुले यांच्या वैचारिक भूमिकेला पुढे नेण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले

सन १९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या 'The journal of India economic society' या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'Small holding in India and their remedies' या लेखात भारतीय शेतीच्या समस्या या संबंधी विचार मांडले आहेत. या लेखात त्यांनी शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे, व सर्व

---

31) कीर धनंजय ( 1968), 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

पृ173.क्र.,174



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17

Scanned with CamScanner